1 8 MAR 2018 महाराष्ट्र टाईम्स

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**मटा अँकर** 'करंट सायन्स'च्या राष्ट्रीय क्रमवारीत विद्यापीठाने मिळवले मोठे यश

# संशोधनात शिवाजी विद्यापीठ आठवे

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

देशातील अकृषी राज्य विद्यापीठांत शिवाजी विद्यापीठाने राष्ट्रीय पातळीवर अग्रस्थान प्राप्त केले आहे. आघाडीच्या 'टॉप-१०' संशोधन संस्थांच्या सर्वसाधारण यादीत विद्यापीठ देशात आठवे आले आहे. विशेष म्हणजे विद्यापीठाने मटेरियल सायन्स, भौतिकशास्त्र व खगोल आणि अभियांत्रिकी या तीन विषयांमध्ये राष्ट्रीय स्तरावर अकृषी राज्य विद्यापीठांत प्रथम स्थान प्राप्त केले आहे. 'करन्ट सायन्स' या जागतिक आघाडीच्या ताज्या अंकात ही क्रमवारी जाहीर झाली आहे.

'करन्ट सायन्स'च्या २५ फेब्रुवारी २०१८च्या अंकात 'रिसर्च आउटपूट ऑफ इंडियन इन्स्टिट्युशन्स ड्युरिंग २०११-१६ : क्वालिटी अँड क्वांटिटी परस्पेक्टिव्ह' हा विशेष लेख प्रकाशित झाला आहे. यामध्ये जागतिक संशोधनाचा दर्जा निश्चित करणाऱ्या 'साय-व्हॅल' निर्देशांकाच्या आकडेवारीचा आधार घेतला आहे. सरासरी राष्ट्रीय निर्देशांकापेक्षा ज्या संशोधन संस्थांचे निर्देशांक अधिक आहेत, अशा सात विद्याशाखांचा दर्जात्मक अभ्यास या लेखात केला आहे. यामध्ये वैद्यकीय, अभियांत्रिकी, संगणकशास्त्र, भौतिकशास्त्र व खगोल, रसायनशास्त्र, बीजीएम अर्थात बायोकेमिस्ट्री, जेनेटिक्स व मॉलेक्युलर बायोलॉजी आणि मटेरियल सायन्स यांचा समावेश आहे.



**विद्यापीठातील संशोधकांचे शोधनिबंध जागतिक स्तरावरील संशोधकांकडून अभ्यासले जातात, विविध शोधनिबंधांमधून त्यांच्या शोधनिबंधांचे साइटेशन्स मोठ्या प्रमाणावर दिले जातात, ही अभिमानास्पद बाब आहे. अकृषी विद्यापीठांत देशात आणि राज्यातही प्रथम स्थान मिळवूनी विद्यापीठाने संशोधनाची संख्या व गुणवत्ता या दोन्ही बाबतीत संतुलन साधल्याचे स्पष्ट झाले आहे.**

**- डॉ. देवानंद शिंदे**, कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ



२०११ ते २०१६ या कालावधीत वर्षाला तीनशेहून अधिक शोधनिबंधांचे प्रकाशन आणि राष्ट्रीय सरासरी (९ टक्के) पेक्षा टॉप-१० पर्सेंटाईल आउटपूट या निकषांवर देशातील आघाडीच्या संशोधन संस्थांची क्रमवारी लेखात दिली आहे. यामध्ये इंडियन असोसिएशन फॉर द कल्टिव्हेशन ऑफ सायन्स, कोलकता ही संस्था प्रथम क्रमांकावर आहे. यादीत सहाव्या क्रमांकावर असलेले चंदीगड येथील पंजाब विद्यापीठ अकृषी विद्यापीठांत प्रथम स्थानी, तर शिवाजी विद्यापीठ १९२८ प्रकाशने व २०.४ पर्सेंटाईलसह देशात आठव्या आणि अकृषी विद्यापीठांत प्रथम स्थानी आहे. मटेरियल सायन्समध्ये शिवाजी विद्यापीठ तिसऱ्या, तर भौतिकशास्त्र व खगोल विषयात विद्यापीठ तिसऱ्या स्थानी आहे. तसेच, अभियांत्रिकी विषयात साहा इन्स्टिट्यूट ऑफ न्यूक्लिअर फिजिक्स, कोलकाता प्रथम स्थानी, जवाहरलाल नेहरू सेंटर फॉर एडव्हान्स्ड सायंटिफिक रिसर्च, बेंगळुरू द्वितीय स्थानी, तर शिवाजी विद्यापीठ तृतीय व अकृषी राज्य विद्यापीठांत प्रथम स्थानी आहे.

18 MAR 2018

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# संशोधन क्षेत्रात शिवाजी विद्यापीठ अग्रस्थानी

## मटेरियल सायन्स संशोधनात राष्ट्रीय स्तरावर; भौतिकशास्त्र, खगोल, अभियांत्रिकी संशोधनातही प्रथम

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाने संशोधनाच्या क्षेत्रातील आपली आगेकूच कायम राखताना देशातील अकृषी राज्य विद्यापीठांत राष्ट्रीय पातळीवर अग्रस्थान प्राप्त केले आहे. आघाडीच्या टॉप-१० संशोधन संस्थांच्या सर्वसाधारण यादीत विद्यापीठ देशात आठवे आहे. विशेष म्हणजे विद्यापीठाने मटेरियल सायन्स, भौतिकशास्त्र व खगोल आणि अभियांत्रिकी या तीन विषयांमध्ये राष्ट्रीय स्तरावर अकृषी राज्य विद्यापीठांत प्रथम स्थान प्राप्त केले आहे. करंट सायन्स या जागतिक आघाडीच्या ताज्या अंकात ही क्रमवारी जाहीर झाली आहे.

शिवाजी विद्यापीठाच्या ५४ व्या दीक्षांत समारंभाच्या पार्श्वभूमीवर संशोधनाच्या क्षेत्रातील विद्यापीठाचे देशातील अग्रस्थान या निमित्ताने पुन्हा अधोरेखित झाले.

करंट सायन्सच्या ताज्या अंकात रिसर्च आऊटपूट ऑफ इंडियन इन्स्टिट्यूशन्स ड्युरिंग २०११-१६ क्वॉलिटी अँड क्वाँटिटी परस्पेक्टिव्ह हा विशेष लेख प्रकाशित झाला आहे. यामध्ये जागतिक संशोधनाचा दर्जा निश्चित करणाऱ्या साय-व्हॅल निर्देशांकाच्या आकडेवारीचा आधार घेण्यात आला आहे. सरासरी राष्ट्रीय निर्देशांकापेक्षा ज्या संशोधन संस्थांचे निर्देशांक अधिक आहेत, अशा सात विद्याशाखांचा दर्जात्मक अभ्यास या लेखात करण्यात आला आहे. यामध्ये वैद्यकीय, अभियांत्रिकी, संगणकशास्त्र, भौतिकशास्त्र व खगोल, रसायनशास्त्र, बीजीएम अर्थात बायोकेमिस्ट्री, जेनेटिक्स व मॉलेक्युलर बायोलॉजी आणि मटेरियल सायन्स यांचा समावेश आहे.

मटेरियल सायन्समध्ये सर्वसाधारण जवाहरलाल नेहरू सेंटर फॉर ॲडव्हान्स्ड सायंटिफिक रिसर्च, बेंगलोर प्रथम स्थानी, इंडियन असोसिएशन फॉर द कल्टिव्हेशन ऑफ सायन्स, कोलकता द्वितीय स्थानी तर शिवाजी विद्यापीठ तिसऱ्या व अकृषी राज्य विद्यापीठांत प्रथम स्थानी आहे. भौतिकशास्त्र व खगोल विषयात पंजाब विद्यापीठ, चंदीगड पहिल्या स्थानी, विश्वभारती विद्यापीठ, कोलकता दुसऱ्या स्थानी तर शिवाजी विद्यापीठ तिसऱ्या स्थानी आहे. तसेच, अभियांत्रिकी विषयात साहा इन्स्टिट्यूट ऑफ न्यूक्लिअर फिजिक्स, कोलकता प्रथम स्थानी, जवाहरलाल नेहरू सेंटर फॉर एडव्हान्स्ड सायंटिफिक रिसर्च, बेंगलोर द्वितिय स्थानी तर शिवाजी विद्यापीठ तृतीय व अकृषी राज्य विद्यापीठांत प्रथम स्थानी आहे.

### संशोधनाची आकडेवारी

सन २०११ ते २०१६ या कालावधीत वर्षाला ३०० हून अधिक शोधनिबंधांचे प्रकाशन आणि राष्ट्रीय सरासरी (९ टक्के) पेक्षा टॉप-१० पर्सेंटाईल आऊटपूट या निकषांवर देशातील आघाडीच्या संशोधन संस्थांची क्रमवारी लेखात देण्यात आली आहे. यामध्ये इंडियन असोसिएशन फॉर द कल्टिव्हेशन ऑफ सायन्स, कोलकता ही संस्था २८९८ प्रकाशने व २६.३ पर्सेंटाईलसह प्रथम क्रमांकावर आहे. यादीत सहाव्या क्रमांकावर असलेले चंदीगड येथील पंजाब विद्यापीठ ५५१४ प्रकाशने व २१.१ पर्सेंटाईलसह अकृषी विद्यापीठांत प्रथम स्थानी तर शिवाजी विद्यापीठ १९२८ प्रकाशने व २०.४ पर्सेंटाईलसह देशात आठव्या आणि अकृषी विद्यापीठांत प्रथम स्थानी आहे. या यादीत मुंबई विद्यापीठ ३८२८ प्रकाशने व १५.६ पर्सेंटाईलसह बाराव्या स्थानी आहे.




**संशोधनाच्या दर्जावर विद्यापीठाच्या गुणवत्तेवर शिक्कामोर्तब : कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे**

यापूर्वीही, सन २०१६मध्ये करन्ट सायन्सच्या सर्वेक्षणामध्ये शिवाजी विद्यापीठ मटेरियल सायन्स विषयातील संशोधनात अकृषी राज्य विद्यापीठांत देशात आघाडीवर असल्याचे स्पष्ट झाले होते. आणि आता सन २०११ ते २०१६ या कालावधीतील संशोधनावर आधारित जाहीर झालेल्या ताज्या आकडेवारीनुसार, शिवाजी विद्यापीठाच्या संशोधनाच्या क्षेत्रातील दर्जा व गुणवत्तेवर आणखी पुन्हा शिक्कामोर्तब झाले आहे. मटेरिअल सायन्स, भौतिकशास्त्र व खगोल आणि अभियांत्रिकी या विषयांमधील संशोधनात राष्ट्रीय स्तरावर सर्वसाधारण यादीत तिसरे व अकृषी विद्यापीठांत पहिले स्थान पटकावून या क्षेत्रातील आपले प्रभुत्व सिद्ध केले आहे. याबद्दल विद्यापीठातील शिक्षक, संशोधक आणि संशोधक विद्यार्थी हे सर्वच घटक अभिनंदनास पात्र आहेत.

जनसंपर्क कक्ष
1 8 MAR 2018 सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाचा संशोधन क्षेत्रात डंका

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १७ : शिवाजी विद्यापीठाने संशोधनाच्या क्षेत्रातील आपली आगेकूच कायम राखताना देशातील अकृषी राज्य विद्यापीठांत राष्ट्रीय पातळीवर अग्रस्थान प्राप्त केले आहे. आघाडीच्या टॉप-१० संशोधन संस्थांच्या सर्वसाधारण यादीत विद्यापीठ देशात आठवे आहे. विशेष म्हणजे विद्यापीठाने मटेरियल सायन्स, भौतिकशास्त्र, खगोल आणि अभियांत्रिकी या तीन विषयांमध्ये राष्ट्रीय स्तरावर अकृषी राज्य विद्यापीठांत प्रथम स्थान प्राप्त केले आहे. विद्यापीठाच्या ५४ व्या दीक्षान्त समारंभाच्या पार्श्वभूमीवर, संशोधनाच्या क्षेत्रातील हे यश विद्यापीठाच्या नावलौकिकात भर टाकत आहे.

पान २ वर »

## शिवाजी विद्यापीठाचा संशोधन क्षेत्रात डंका

» पान १ वरून

'करंट सायन्स'च्या २५ फेब्रुवारी २०१८ च्या अंकात रिसर्च आऊटपुट ऑफ इंडियन इन्स्टिट्यूशन्स ड्युरिंग २०११-१६ क्वालिटी अँन्ड क्वांटिटी परस्पेक्टिव्ह हा विशेष लेख प्रकाशित झाला आहे. यामध्ये जागतिक संशोधनाचा दर्जा निश्चित करणाऱ्या साय-व्हॅल निर्देशांकाच्या आकडेवारीचा आधार घेण्यात आला. सरासरी राष्ट्रीय निर्देशांकापेक्षा ज्या संशोधन संस्थांचे निर्देशांक अधिक आहेत, अशा सात विद्या शाखांचा दर्जात्मक अभ्यास या लेखात केला आहे. यामध्ये वैद्यकीय, अभियांत्रिकी, संगणकशास्त्र, भौतिकशास्त्र व खगोल, रसायनशास्त्र, बीजीएम अर्थात बायोकेमिस्ट्री, जेनेटिक्स व मॉलेक्युलर बायोलॉजी आणि मटेरियल सायन्स यांचा समावेश होता.

२०११ ते २०१६ या कालावधीत वर्षाला ३०० हून अधिक शोधनिबंधांचे प्रकाशन आणि देशातील आघाडीच्या संशोधन संस्थांची क्रमवारी लेखात देण्यात आली आहे. यामध्ये इंडियन असोसिएशन फॉर द कल्टिव्हेशन ऑफ सायन्स, कोलकाता ही संस्था २८९८ प्रकाशने व २६.३ पर्सेंटाईलसह प्रथम क्रमांकावर आहे. शिवाजी विद्यापीठाने १९२८ प्रकाशने व २०.४ पर्सेंटाईलसह देशात आठव्या आणि अकृषी विद्यापीठात प्रथम क्रमांक पटकावला आहे. या यादीत मुंबई विद्यापीठ ३८२८ प्रकाशने व १५.६ पर्सेंटाईलसह बाराव्या स्थानी आहे.

**“ शिवाजी विद्यापीठाच्या संशोधनाच्या क्षेत्रातील दर्जा व गुणवत्तेवर पुनश्च शिक्कामोर्तब झाले आहे. मटेरिअल सायन्स, भौतिकशास्त्र व खगोल आणि अभियांत्रिकी या विषयांमधील संशोधनात राष्ट्रीय स्तरावर सर्वसाधारण यादीत तिसरे व अकृषी विद्यापीठांत पहिले स्थान पटकावून या क्षेत्रातील प्रभुत्व सिद्ध केले आहे.**

**- डॉ. देवानंद शिंदे,** कुलगुरू

त्याखेरीज, या संशोधन संस्थांचे फिल्ड वेट सायटेशन निर्देशांक (एफ.डब्ल्यू. सी.आय.) यावर आधारित विषयनिहाय विश्लेषण केले आहे. त्यामध्ये मटेरियल सायन्स, भैतिकशास्त्र व खगोल आणि अभियांत्रिकी या तीन विषयांमध्ये शिवाजी विद्यापीठ राष्ट्रीय स्तरावर सर्वसाधारण यादीत तिसऱ्या तर अकृषी राज्य विद्यापीठांत प्रथम स्थानी असल्याचे स्पष्ट झाले आहे. मटेरियल सायन्समध्ये सर्वसाधारण जवाहरलाल नेहरू सेंटर फॉर ॲडव्हान्स्ड सायंटिफिक रिसर्च, बेंगलोर प्रथम स्थानी, इंडियन असोसिएशन फॉर द कल्टिव्हेशन ऑफ सायन्स, कोलकाता द्वितीय स्थानी तर शिवाजी विद्यापीठ तिसऱ्या व अकृषी राज्य विद्यापीठांत प्रथम स्थानी आहे.

18 MAR 2018 लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


### मटेरिअल सायन्समधील संशोधन : भौतिकशास्त्र, खगोल, अभियांत्रिकीत प्रथम

# संशोधन संस्थांत देशात शिवाजी विद्यापीठ आठवे

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : शिवाजी विद्यापीठाने संशोधनाच्या क्षेत्रातील आपली आगेकूच कायम राखताना देशातील अकृषी राज्य विद्यापीठांत शिवाजी विद्यापीठाने राष्ट्रीय पातळीवर अग्रस्थान प्राप्त केले आहे. आघाडीच्या टॉप-१० संशोधन संस्थांच्या सर्वसाधारण यादीत विद्यापीठ देशात आठवे आहे. 'करंट सायन्स' या जागतिक आघाडीच्या ताज्या अंकात ही क्रमवारी जाहीर झाली आहे.

विद्यापीठाच्या ५४ व्या दीक्षान्त समारंभाच्या पार्श्वभूमीवर, संशोधनाच्या क्षेत्रातील शिवाजी विद्यापीठाचे देशातील अग्रस्थान या निमित्ताने पुनश्च अधोरेखित झाले आहे. विशेष म्हणजे विद्यापीठाने मटेरिअल सायन्स, भौतिकशास्त्र व खगोल आणि अभियांत्रिकी या तीन विषयांमध्ये राष्ट्रीय स्तरावर अकृषी राज्य विद्यापीठांत प्रथम स्थान प्राप्त केले आहे.



> शिवाजी विद्यापीठातील संशोधकांचे शोधनिबंध जागतिक स्तरावरील संशोधकांकडून अभ्यासले जातात. विविध शोधनिबंधांमधून त्यांच्या शोधनिबंधांचे साइटेशन्स मोठ्या प्रमाणावर दिले जातात, ही अभिमानास्पद बाब आहे. विद्यापीठातील शिक्षक, संशोधक आणि संशोधक विद्यार्थी हे सर्वच घटक अभिनंदनास पात्र आहेत.
>
> **- डॉ. देवानंद शिंदे,**
> कुलगुरु, शिवाजी विद्यापीठ

करंट सायन्सच्या दि. २५ फेब्रुवारी २०१८ च्या अंकात 'रिसर्च आउटपुट ऑफ इंडियन इन्स्टिट्यूशन्स ड्युरिंग २०११-१६ : क्वालिटी अँड क्वांटिटी परस्पेक्टिव्ह' हा विशेष लेख प्रकाशित झाला आहे. यामध्ये जागतिक संशोधनाचा दर्जा निश्चित करणाऱ्या हसाय-व्हॅल निर्देशांकाच्या आकडेवारीचा आधार घेण्यात आला आहे. सरासरी राष्ट्रीय निर्देशांकापेक्षा ज्या संशोधन संस्थांचे निर्देशांक अधिक आहेत, अशा सात विद्याशाखांचा दर्जात्मक अभ्यास या लेखात करण्यात आला आहे. यामध्ये वैद्यकीय, अभियांत्रिकी, संगणकशास्त्र, भौतिकशास्त्र व खगोल, रसायनशास्त्र, बीजीएम अर्थात बायोकेमिस्ट्री, जेनेटिक्स व मॉलेक्युलर बायोलॉजी व मटेरिअल सायन्स यांचा समावेश आहे. २०११ ते २०१६ या कालावधीत वर्षाला ३००हून अधिक शोधनिबंधांचे प्रकाशन आणि राष्ट्रीय सरासरी (नऊ टक्के) पेक्षा टॉप-१० पर्सेंटाईल आउटपुट या निकषांवर देशातील आघाडीच्या संशोधन संस्थांची क्रमवारी लेखात देण्यात आली आहे.

संशोधन संस्थांचे फिल्ड वेट सायटेशन निर्देशांक (एफ.डब्ल्यू.सी.आय.) यावर आधारित विषयनिहाय विश्लेषण करण्यात आले असून, त्यामध्ये मटेरिअल सायन्स, भौतिकशास्त्र, खगोलशास्त्र आणि अभियांत्रिकी या तीन विषयांमध्ये शिवाजी विद्यापीठ राष्ट्रीय स्तरावर सर्वसाधारण यादीत तिसऱ्या, तर अकृषी राज्य विद्यापीठांत प्रथम स्थानी असल्याचे स्पष्ट झाले आहे.

मटेरिअल सायन्समध्ये शिवाजी विद्यापीठ तिसऱ्या व अकृषी राज्य विद्यापीठांत प्रथम स्थानी आहे. भौतिकशास्त्र व खगोल या विषयांत शिवाजी विद्यापीठ तिसऱ्या स्थानी आहे. तसेच, अभियांत्रिकी विषयात शिवाजी विद्यापीठ तृतीय व अकृषी राज्य विद्यापीठांत प्रथम स्थानी आहे.

जनसंपर्क कक्ष
1 8 MAR 2018 पुढारी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाचा उद्या दीक्षांत समारंभ

## 'इस्त्रो'चे माजी अध्यक्ष ए. एस. किरणकुमार यांची उपस्थिती

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाचा ५४ वा दीक्षांत समारंभ सोमवारी (दि.१९) सकाळी अकरा वाजता विद्यापीठाच्या प्रांगणात होणार आहे. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून 'इस्त्रो'चे माजी अध्यक्ष आणि ज्येष्ठ शास्त्रज्ञ ए. एस. किरणकुमार हे उपस्थित राहणार आहेत.

दीक्षांत समारंभाला जवळपास तीस हजारांहून अधिक विद्यार्थी-पालकांची दरवर्षी गर्दी असते. त्यामुळे याबाबतचे काटेकोर नियोजन पूर्ण झाले असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले.

सोमवारी (दि. १९) सकाळी साडेसात वाजता कमला कॉलेज येथून ग्रंथदिंडीस सुरुवात होईल. सकाळी नऊ वाजता ग्रंथमहोत्सवाचे उद्घाटन होईल. सकाळी अकरा वाजता मुख्य पदवीदान कार्यक्रमास सुरुवात होईल. तर सायंकाळी पाच वाजता सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहे. ग्रंथ महोत्सव दोन दिवस असणार आहे. दीक्षांत समारंभाची तयारी पूर्ण झाली आहे. कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर आदींसह विविध क्षेत्रांतील मान्यवरांची समारंभास उपस्थिती असणार आहे.

दिक्षांत समारंभात यंदा ५० हजार ४४४ पदवी प्रदान केल्या जाणार आहेत. दिक्षांत समारंभात प्रत्यक्ष उपस्थित राहून २४ हजार २४५ विद्यार्थी पदवी घेणार आहेत. तर अनुपस्थित २६ हजार १९९ विद्यार्थी पदवी घेतील. विविध अभ्यासक्रमांतून पीएचडी मिळवलेले २७९ जण आहेत. यंदा २६ हजार ९३८ इतक्या उच्चांकी संख्येने विद्यार्थीनी पदवी घेणार आहेत तर विद्यार्थ्यांची संख्या २३ हजार ५०६ इतकी आहे.

### इंजिनिअरिंगमध्ये सर्वाधिक पदवी

विद्यापीठ कार्यक्षेत्रात १३३९६ इतक्या सर्वाधिक पदवी इंजिनिअरिंग आणि टेक्नॉलॉजी या अभ्यासक्रमात विद्यार्थ्यांना मिळणार आहे. यानंतर वाणिज्य अभ्यासक्रमासाठी ११२०४ व शास्त्र अभ्यासक्रमासाठी १०९७१ इतक्या विद्यार्थ्यांना पदवी मिळणार आहे. कला अभ्यासक्रमासाठी हेच प्रमाण ४८६७ इतके आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
1 8 MAR 2018
लोकमत

# दीक्षान्त समारंभाची तयारी अंतिम टप्प्यात

## दिंडीने प्रारंभ : उद्या सकाळी कार्यक्रम

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचा ५४ वा दीक्षान्त समारंभ उद्या, सोमवारी होणार आहे. या समारंभाची तयारी अंतिम टप्प्यात आली आहे. विद्यापीठ परिसरात समारंभाची लगबग शनिवारी रात्री उशिरापर्यंत सुरु होती.

शिवाजी विद्यापीठातील लोककला केंद्रात मुख्य समारंभ होणार आहे. मुख्य मंडप, स्टॉल उभारणीसह सजावटीच्या कामाला वेग आला आहे. दुचाकी व चारचाकी वाहनांच्या पार्किंगची स्वतंत्र व्यवस्था करण्यात आली आहे. मुख्य समारंभास प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ अवकाश शास्त्रज्ञ ए. एस. किरणकुमार हे उपस्थित राहणार आहेत. त्यांना वाय प्लस सुरक्षा व्यवस्था असल्याने सुरक्षेच्यादृष्टीने आवश्यक त्या उपाययोजनाही केल्या जात आहेत.

यंदा प्रथमच दीक्षान्त सोहळा हा दुपारी न होता सकाळी अकरा वाजता होणार आहे. सकाळी सात वाजता ग्रंथ दिंडीने कार्यक्रमाची सुरुवात होईल. त्यानंतर नऊ वाजता ग्रंथ महोत्सवाचे उद्घाटन होणार आहे. ग्रंथ दिंडीची तयारी पूर्ण झाली आहे. ग्रंथ महोत्सवासाठी लोककला केंद्रासमोरची जागा स्वच्छ करण्यात आली आहे. येथे स्टॉल उभारले जात आहेत. येथे ग्रंथाचे ५० हून अधिक स्टॉल उभारण्यात येत आहेत. परीक्षा भवन क्र. १ आणि लोककला केंद्रासमोर पदवी प्रमाणपत्रांचे वितरण केले जाणार आहे. त्यासाठी ८१ स्टॉल उभारण्याचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. प्रत्येक स्टॉलमधून सुमारे ३०० पदव्या दिल्या जाणार आहेत. यावेळी ५० हजार ४४४ स्नातकांना पदवी प्रमाणपत्रांचे वाटप केले जाणार आहे.

◆ यावर्षी दीक्षान्त सोहळा सकाळी अकरा वाजता होणार आहे. सात वाजता ग्रंथ दिंडीने कार्यक्रमाची सुरुवात होईल.

परीक्षा भवन क्र. २ च्या मागील बाजूला असणाऱ्या मोकळ्या जागेत चारचाकी व दुचाकी वाहनांची पार्किंगची सोय करण्यात आली आहे. येथील भागाची स्वच्छता करून तेथे पट्टे मारुन फलकही लावले आहेत. सुरक्षेच्यादृष्टीने बैठक व्यवस्था, तसेच पार्किंग व्यवस्थेबाबतच्या आवश्यक त्या उपायोजनांची आढावा बैठकही विद्यापीठातील अधिकाऱ्यांनी घेतली.

जनसंपर्क कक्ष
18 MAR 2018 सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# दीक्षान्त समारंभाची तयारी अंतिम टप्प्यात

कोल्हापूर, ता. १७ : शिवाजी विद्यापीठाच्या ५४ व्या दीक्षान्त समारंभाची तयारी अंतिम टप्प्यात आली आहे. मंडप, स्टॉल उभारणीसह सजावटीच्या कामाला वेग आला आहे. पार्किंगची स्वतंत्र व्यवस्था आहे. शिवाजी विद्यापीठाचा ५४ वा दीक्षान्त सोहळा सोमवारी (ता. १९) होणार आहे. विक्रम साराभाई डिस्टिंग्विश्ड इस्रोचे प्रोफेसर ए. एस. किरणकुमार यांची प्रमुख उपस्थिती राहील. त्यांना वाय प्लस सुरक्षा व्यवस्था असल्याने सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक त्या उपाययोजनाही केल्या जात आहेत.

यंदा प्रथमच दीक्षान्त सोहळा हा सकाळी अकरा वाजता होईल. सकाळी ग्रंथ दिंडी होईल. नऊ वाजता ग्रंथ महोत्सवाचे उद्घाटन होणार आहे. ग्रंथ दिंडीची तयारी पूर्ण झाली आहे. ग्रंथ महोत्सवासाठी लोककला केंद्रासमोर जागा स्वच्छ केली. येथे भव्य मंडप उभारला जात आहे. येथे ग्रंथाचे ५० हून अधिक स्टॉल उभारण्यात येत आहेत. परीक्षा भवन क्रमांक एक आणि लोककला केंद्रासमोर पदवी प्रमाणपत्रे देण्यात येणार आहेत. त्यासाठी ८१ स्टॉल उभारण्याचे काम अंतिम टप्प्यात आहे. प्रत्येक स्टॉलमधून सुमारे ३०० पदव्या दिल्या जाणार आहेत. एकूण ५० हजार ४४४ पदव्यांचे वाटप केले जाईल.

मुख्य समारंभ होणाऱ्या लोककला केंद्राची स्वच्छता, सजावटीचे काम गतीने सुरू आहे. त्याचबरोबर परीक्षा भवन क्रमांक दोनच्या पिछाडीस असणाऱ्या मोकळ्या जागेत चारचाकी व मोटारसायकल पार्किंगची सोय आहे. ए. एस. किरणकुमार यांना 'वाय प्लस' सुरक्षा व्यवस्था असल्याने प्रोटोकॉलप्रमाणे त्यांची व्यवस्था केली जात आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
18 MAR 2018
पुढारी

# सकारात्मकतेने तंत्रज्ञानातील बदल स्वीकारा : काकडे

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

तंत्रज्ञानाच्या हस्तांतरणामुळे नेहमी आव्हाने आणि संधी निर्माण होतात. सकारात्मकतेने तंत्रज्ञानातील बदल स्वीकारले पाहिजेत, असे मत शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे यांनी येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या वाणिज्य आणि व्यवस्थापन अधिविभागामार्फत 'उद्योन्मुख अर्थव्यवस्थेमध्ये वाणिज्य आणि व्यवस्थापनाची भूमिका' या विषयावर विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र सभागृहामध्ये दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटन प्रसंगी काकडे बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर होते.

काकडे म्हणाले, उद्योन्मुख अर्थव्यवस्थेची संकल्पना आता बदलत आहे. व्यवसायातील अनिश्चितता ही बाब उद्योग-व्यावसायिकांसाठी फार महत्त्वाची आहे. बहुतेक विकसनशील कंपन्या उद्योन्मुख अर्थव्यवस्था म्हणून पुढे येत आहेत. परिस्थिती आता बदलली आहे. जागतिक बँकेच्या २०१७ च्या अहवालानुसार जलद वाढणारी अर्थव्यवस्था म्हणून इथोपीया देशाचा प्रथम क्रमांक लागतो. त्यापाठोपाठ उझबेकीस्तान, नेपाळ त्यानंतर भारत चौथ्या क्रमांकवर आहे. मान्सूनमुळे हे बदल झाले आहेत. कुलसचिव डॉ. नांदवडेकर म्हणाले, उद्योजकता निर्मितीमध्ये आपल्या अर्थव्यवस्थेला चालना देण्यासाठी तरुण उद्योजकांनी सक्रिय सहभाग घेतला पाहिजे. जागतिक तंत्रज्ञानामुळे विविध मालांच्या उत्पादनावर प्रक्रिया करून लोकांच्या गरजा भागविणे शक्य झाले आहे. त्यामुळे व्यावसायिकांनी आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती सातत्याने घेणे आवश्यक आहे. डॉ. ए. एम. गुरव यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. डॉ. के. व्ही. मारुलकर यांनी आभार मानले.

1 8 MAR 2018 Times of India जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# Varsity to start web radio on March 19

Piyush.Bhusari
@timesgroup.com

**Kolhapur:** The Shivaji University, Kolhapur (SUK) is all set to start its web radio operations from March 19, the day of its 54th convocation ceremony, said D T Shirke, pro-VC of SUK.

Shirke said that the necessary formalities have been completed and the management council of the varsity has granted its approval last week.

He added that setting up the web-radio is quite easy. First of all, it does not require licence to broadcast the shows and anyone having internet access, can listen to it and download it.

"We will be making sure that important lectures, speeches and several other audio related topics can be included in the web radio service. The Centre for Distance Education (CDE) will look after the overall management of the web radio," he said.

## SALIENT FEATURES

- Will broadcast educational programs
- Will also create a database of the past lectures, events covered on radio
- Students will get a chance to work on the various programs in the campus

Shirke added that a separate link will be created on its existing web-portal, wherein all the latest important audio speeches or lectures will be present.

Regarding selection of the matter, he said numerous amounts of conferences and programs are organised at the varsity departments. Each department's committee will select the matter to be uploaded on the web radio.

"Since it is going to be open to all and on public domain, we will have to be careful that the content matches quality and adheres to certain guidelines," he said.

Shirke said that they have also applied for launching community radio service, just like the one present in Savitribai Phule Pune University and several other eminent educational institutions. "However it is likely to take time, as the decisions are taken at the union ministry level," he said.

The allocation of the frequency depends on the purpose of the community radio set up. "Since we are setting up the radio for the educational activity purpose, there wont much hurdle in it," he said.

Shirke added that the university is aiming to improve its performance in the National Assessment and Accreditation Council (NAAC) in its reaccreditation cycle in 2019. It will receive major boost with the launch of the web radio service.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
1 8 MAR 2018
पुढारी

# विद्यापीठात 'कीड मॅनेजमेंट' परिषद

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात ॲग्रोकेमिकल आणि कीड व्यवस्थापन विभाग अंतर्गत रिसेन्ट ॲडव्हान्स इन ॲग्रोकेमिकल अँड इंटिग्रेटेड कीड मॅनेजमेंट या विषयावर राष्ट्रीय परिषद आयोजित करण्यात आली. परिषदेचे उद्‌घाटन डॉ. जितेंद्र कुमार यांनी केले. यावेळी डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. योगिता चव्हाण , डॉ. ए. के. साहू, डॉ व्ही. डी. नांदवडेकर उपस्थित होते.